Lokmat

Printed from Lokmat epaper, Published on Saturday, July 26, 2014, Lokmat Ahemadnagar Page No. 2

A A A << Back to Headlines Next >>

# स्थानिक उद्योगांच्या अडचणी सोडवू

## चेंबरचा आयएमएसशी करार

■ येथील आयएमएस व स्मॉल अँण्ड मीडिय बिजनेस डेव्हलपमेंट चेंबर ऑफ इंडिया यांच्यात एक करार यावेळी झाला. या संस्थेत शिक्षण घेऊन उद्योजक होऊ इच्छिणाऱ्या नव उद्योजकांना चेंबरच्या वतीने मार्गदर्शन केले जाणार आहे. उद्योगासाठी लागणाऱ्या सुविधाही पुरविण्याचे ठरले असून,उद्योगाचे जाळे निर्माण करण्याच्यादृष्टीने हा कारार महत्वाचा असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

नऊ उद्योजकांना आदर्श उद्योजक पुरस्कार प्रदान

■ जिल्हा उद्योजक परिषदेत जिल्ह्यातील सतीश गवळी, मधूकर शिंदे, दीपक लांडगे, जया औटी, कविता जाधव, मधूबाला चोरडिया, मंदा निमसे, संजय पारनाईक , मिलिंद कुलकर्णी या नऊ उद्योजकांना आदर्श उद्योजक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अहमदनगर: नगर शहर मोठय़ा शहरांच्या मध्यभागी असूनही येथील उद्योग वाढला नाही. उद्योग का वाढला नाही, उद्योगाच्या काय अडचणी आहेत, याचा अभ्यास करून येथील उद्योगाला चालना देण्यासाठी पुढील काळात प्रयत्न करणार असल्याचे स्मॉल अँण्ड बिझनेस डेव्हलपमेंट चेंबर ऑफ इंडियाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत साळुंखे यांनी शुक्रवारी येथे सांगितले.

आयएमएसतर्फे आयोजित जिल्हा उद्योजक परिषदेत ते बोलत होते. डॉ. शरद कोलते, आमीचे अध्यक्ष अशोक सोनवणे, मराठा चेंबरचे अरविंद पारगावकर, अँटो इंजिनिरिंगचे भिंगारदिवे, डॉ. एन. बी मेहता, हरजितसिंग वधवा आदी उद्योजक उपस्थित होते. साळुंखे म्हणाले, नगर शहर झपाट्याने विकसित होत असलेल्या मुंबई,पुणे,औरंगाबाद आणि नाशिकच्या मध्यभागी आहे. त्यामुळे येथील औद्योगिक विकास होणे आवश्यक होते. याठिकाणी एल अँण्ड टी कंपनीसारखी मोठी कंपनी आहे.मात्र स्थानिक लघु व मध्यम उद्योगांना सहकार्य नसल्याने आणि पोषक वातावरण नाही, त्यामुळे नगरचा औद्योगिक विकास खुंटला आहे.त्यासाठी स्थानिक उद्योजकांनी आपले नेटवर्क वाढविणे गरजेचे आहे. विदेशात मोठय़ा संधी उपलब्ध होत आहेत. या संधीचा फायदा घ्या. त्यासाठी दज्रेदार उत्पादन तयार करण्यासाठी नव्या माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करा, असे यावेळी ते म्हणाले. विदेशातील अनेक कंपन्या भारतात येण्यास इच्छुक आहेत. जपान, कोरिया आणि चीनमधील कंपन्यांसाठी मध्यंतरी करारही झाला आहे. भारतात चांगल्या प्रकारे उत्पादन होऊ शकते. त्यामुळे विदेशी कंपन्यांचा भारतात ओघ सुरू आहे. मात्र या कंपन्यांची आपल्याकडील स्थानिक उद्योगांना मदत होणे गरजेचे आहे. स्थानिक उद्योग वाढविण्यासाठी मोठे उद्योग आणणे गरजेचे आहे. मोठय़ा उद्योगांना येण्यास हवे असणारे पोषक वातावरण इथे तयार झाले पाहिजे. हे वातावरण तयार करण्याचे काम आमची संस्था करत असून, येथील उद्योगांच्या काय अडचणी आहेत, याचा अभ्यास करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. याविषयी एक अहवाल तयार करून त्यानुसार अडचणी सोडविण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे साळुंखे यांनी यावेळी सांगितले. (प्रतिनिधी)